# वास्तुदर्शन

**(पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघाचे मुखपत्र)**

संपादक :
**सुहास पटवर्धन,** अध्यक्ष

संपादन सहाय्य :
**संचालक मंडळ**

पत्ता : ३१३ नारायण पेठ, प्रभात प्रेससमोर,
विजय टॉकीज जवळ, पुणे ४११ ०३०.
**दूरभाष : ०२०-२४४५४०१०**
**ई-मेल : punefed@gmail.com**
**वेबसाईट : www.punefed.com**
**यूट्यूब चॅनल : Pune District Housing Federation**
पृष्ठ संख्या - १८
कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते.

वर्ष-१२ * डिसेंबर २०२५ * अंक - ६




आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५ सहकार दिंडीत सहभागी सहकार मित्र मेळावा
१७ नोव्हेंबर २०२५ - मडगाव, गोवा.




दि. १७ नोव्हेंबर २०२५ - गोवा आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत गोव्यातील सहकारी संस्थांचे कार्य तसेच देशातील सर्व सहकारी संस्थांसाठी मार्गदर्शन करताना गोव्याचे सहकार मंत्री मा. श्री. सुभाष शिरोडकर आणि उपस्थित मान्यवर.




दि. १७ नोव्हेंबर २०२५ - गोवा आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत सहकारी गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरण आणि पुनर्विकास या विषयावर मार्गदर्शन करताना महाराष्ट्राचे सहकार आयुक्त मा. श्री. दिपक तावरे आणि उपस्थित मान्यवर.
डावीकडून श्री. सीताराम राणे (उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य महासंघ),
श्री. सुहास पटवर्धन (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य महासंघ)
मा. दीपक तावरे, मा. श्री. सुभाष शिरोडकर (सहकार मंत्री गोवा)



दि. १७ नोव्हेंबर २०२५ – आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत मा. श्री. प्रकाश दरेकर (उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य महासंघ) यांच्या हस्ते गोव्याच्या सहकारी संस्थांचे रजिस्ट्रार मा. श्री. आशुतोष आपटे यांचा सत्कार व उपस्थित मान्यवर.




दि. १७ नोव्हेंबर २०२५ – गोवा आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत **Woment Empowerment** या विषयावर मार्गदर्शन करताना NCUI दिल्लीच्या संचालक श्रीमती सावित्री सिंग व उपस्थित अन्य मान्यवर.



गोवा सहकार परिषदेसाठी उपस्थित महाराष्ट्र, गोवा आणि देशाच्या अन्य भागातून उपस्थित सह. गृह संस्थांचे प्रतिनिधी.



दि. २४ नोव्हेंबर २०२५ – मा. सहकार आयुक्त यांच्यासोबत महारेरा व मोफा कायद्याबाबत चर्चा करताना महासंघाचे संचालक व अधिकारी.

## पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित

punefed@gmail.com

♦ *संचालक मंडळ* ♦

| | |
|---|---|
| मा. सुहास पटवर्धन, अध्यक्ष | ९४२२००४७०१ |
| मा. सुभाष कर्णिक, उपाध्यक्ष | ९७६६६०६१४६ |
| सौ. मनीषा कोष्टी, सचिव | ९९२२४१९२१६ |
| मा. चारूहास कुलकर्णी, कोषाध्यक्ष | ९५५२५४६६०७ |
| मा. अनिल असगेकर | ९९६०६०८०७३ |
| मा. सुभाष ढवळे | ९४२१०५८२५५ |
| ॲड. मृद्गंधा जोशी | ८७६६४३२७६९ |
| मा. जुजर हैदरी | ९३७१०१७४४० |
| मा. शिवाजी उराडे | ९४२३०१५९९६ |
| मा. अजित चौगुले | ७७५७०२१९५३ |
| मा. विलास थोरात | ९८९००५४३५१ |
| ॲड. प्रकाश तोंडारे | ९७६३६०३३८४ |
| मा. समीर रुपदे | ९८५०५६७४७५ |
| मा. मनोहर देशपांडे | ९३७१०७३७२७ |
| मा. राजन प्रसादे | ९६०४२१२४३० |
| मा. संभाजी घुंडरे | ९८८१०७७२९६ |
| मा. संजय सूर्यवंशी | ९६२३९२९८८९ |
| मा. अव्हेलिनो नरोना | ९९७०४७३१८९ |

♦ *तज्ञ संचालक* ♦

ॲड. वसंतराव कर्जतकर

आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी

♦ *कार्यकारी संचालक* ♦

कर्नल प्रमोद दहीतुले ९९९९५३७४३२

## संपादकीय

**आं**तरराष्ट्रीय सहकार वर्षाची सांगता होत असताना महासंघाने सहकारी गृह संस्थांसाठी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन मेळावे, परिसंवाद आयोजित केले. संस्थांनी त्याचा निश्चितच लाभ घेतला असेल.

नुकतीच गोव्याला आयोजित करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय सहकार परिषद हा मानबिंदू ठरला. या परिषदेद्वारे जगभरातील सहकारी संस्थांशी आपण जोडले गेलो. अनेक मान्यवर तज्ञ मंडळींचे मार्गदर्शन लाभले. या परिषदेतील महत्त्वाची मार्गदर्शनपर भाषणे महासंघाच्या युट्यूब व इंस्टा चॅनलवर सर्वांना पाहायला / ऐकायला मिळतील.

आता हे २०२५ आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष जरी संपत असले तरी सहकाराची धुरा आपल्याला सदैव सांभाळायची आहे. त्यासाठी सहकार कायदा, नियम, पोटनियम समजाऊन घेऊन संस्थेच्या कारभारात समिती आणि सभासद सर्वांनी हातात हात घालून संस्थेच्या हितासाठी भाग घ्यायचा आहे.

नियमात नवनवीन सुधारणा होत असतात. कोर्टाचे काही निकाल मार्गदर्शक असतात. ते सर्व माहिती व्हावेत व येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात यासाठी महासंघाचे मार्गदर्शन वेळोवेळी घ्यावे.

सभासद संस्थांनी आपल्या परिचित व्यक्तींच्या संस्था महासंघाच्या सभासद व्हाव्यात यासाठी प्रयत्न करावेत. शेवटी सहकार म्हणजेच अवघे धरू सुपंथ.

यूट्यूब चॅनल : Pune District Housing Federation

instagram.com / maharashtrahousingfederation

**– मनीषा विजय कोष्टी**

***

## वास्तुदर्शन मासिक जाहिरात दरपत्रक ✻ GST सह

| | ब्लॅक अॅण्ड व्हाईट | सिंगल कलर | फोर कलर |
|---|---|---|---|
| १/३ पान | २,३६०/- | - | - |
| अर्धे पान | ३,५४०/- | ४,७२०/- | - |
| पूर्ण पान | ४,७२०/- | ५,९००/- | १७,७००/- |
| पूर्ण दोन पाने | - | - | २३,६००/- |

✻ हे दर प्रत्येक महिन्यासाठी लागू राहतील.

✻ १२ महिन्यांसाठी जाहिरात दिल्यास वरील दरात एक महिन्याची सूट मिळेल.

# चिखली मेळावा

**सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी मार्गदर्शन मेळावा – चिखली–मोशी शाखेचा उपक्रम**

पुणे, नोव्हेंबर २०२५ : पुणे जिल्हा सहकारी गृह संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित, पुणे तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने चिखली–मोशी शाखेच्या वतीने सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी मोफत मार्गदर्शन मेळावा नुकताच उत्साहात पार पडला.

हा मेळावा ९ नोव्हेंबर २०२५ या दिवशी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत पार पडला.

**आयोजक आणि विशेष सहकार्य**

या उपक्रमाचे आयोजन पुणे जिल्हा सह. गृह संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्या., पुणे–चिखली–मोशी शाखा यांनी केले.

या कार्यक्रमाला तनिष–२ सहकारी गृहनिर्माण संस्था असोसिएशन यांनी विशेष सहकार्य केले.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून श्री. केतन कोकाटे, श्री. विपुल नवले, श्री. सुमिन माने आणि श्री. अमोल भोईटे यांनी पुढाकार घेतला.

**कार्यक्रमाचे उद्‌घाटन**

कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. नितीन (आप्पा) काळजे, माजी महापौर (पीसीएमसी) यांच्या हस्ते झाले.

त्यांच्यासोबत मा. सचिनभैया लांडगे, कामगार नेते हे विशेष उपस्थित होते.

उद्‌घाटनप्रसंगी आप्पा काळजे म्हणाले –

गृहनिर्माण संस्थांचे प्रश्न केवळ कागदोपत्री नसतात; ते प्रत्येक नागरिकाच्या जीवनाशी थेट जोडलेले असतात. अशा मार्गदर्शन शिबिरांमुळे समित्यांना योग्य दिशा मिळते आणि पारदर्शकता वाढते.

**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन :**

श्री. विजय महाजन (उपाध्यक्ष – चिखली–मोशी शाखा) यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.

**मुख्य विषय आणि वक्त्यांचे विचार**

**१. सभासदांची संस्थेतील भूमिका व सहकारी संस्था कायदा १९६० अंतर्गत जबाबदाऱ्या**

**वक्ते : श्री. मनोहर देशपांडे**(संचालक, पुणे फेडरेशन)

संस्थेतील प्रत्येक सभासद हा मालक असून त्याने जबाबदारीने वागले पाहिजे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत सभासदांच्या हक्कांबरोबरच जबाबदाऱ्या स्पष्ट केल्या आहेत. समिती ही निवडून आलेली प्रतिनिधीमंडळ असते, पण निर्णयप्रक्रियेत सभासदांची जागरूकता अत्यावश्यक आहे. सहकार्य, संवाद आणि पारदर्शकता ही संस्थेची खरी ताकद आहे.

**२. थकबाकी वसुली – कलम १५४बी (२९) व जुने कलम १०१ अंतर्गत कायदेशीर कारवाई**

**वक्ते : श्री. आशिष सातकर** (शाखा अध्यक्ष – चिखली–मोशी)

थकबाकीदारांविरुद्ध कारवाई करताना सहकारी संस्था कायदा १९६० चे कलम १५४बी (२९) आणि जुने कलम १०१ या दोन्हींचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

या कायद्यांच्या अंमलबजावणीत २०१९ च्या दुरुस्तीमुळे प्रक्रिया अधिक जलद व पारदर्शक झाली आहे.

सभासदांना लिखित नोटिसा देऊन, मध्यस्थी आणि नंतरच वसुली कारवाई सुरू करणे ही योग्य पद्धत आहे. महासंघाच्या वसुली अधिकाऱ्यांमार्फत कायदेशीर कारवाई केली जाते.

**३. कन्व्हेअन्स डीड व मोफा / रेरा अंतर्गत अधिकार**

**वक्ते : श्री. बाळकृष्ण घुगे** (अध्यक्ष, पुणे जिल्हा सहकारी खाते कर्मचारी संघटना)

कन्व्हेअन्स डीड हा सोसायटीच्या मालकी हक्काचा पाया आहे.

मोफा कायदा (MOFA Act, 1963) आणि रेरा कायदा (२०१६) नुसार बिल्डरने ठराविक कालावधीत इमारतीचा ताबा सोसायटीकडे हस्तांतरित करणे बंधनकारक आहे.

सर्व सोसायट्यांनी हे कार्य वेळेत पूर्ण करून दस्तऐवजीकरण व्यवस्थित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**४. ऑडिट व टॅक्सेशन – आदर्श उपविधी २०१४ नुसार जबाबदारी**

**वक्ते : श्री. लक्ष्मण इंदोरे** (प्रमाणित लेखापरीक्षक)

ऑडिट म्हणजे फक्त हिशेब तपासणी नव्हे; ती संस्थेच्या व्यवस्थापनाचा आरसा आहे.

आदर्श उपविधी २०१४ अंतर्गत प्रत्येक वर्षी वैध लेखापरीक्षण करणे बंधनकारक आहे.

तसेच जीएसटी, इन्कम टॅक्स आणि मेंटेनन्सवरील कर विषयक नियमांची अचूक अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

**५. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष – सहकार भावना व सामूहिक जबाबदारी**

**वक्ते : मा. सुहास पटवर्धन** (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आणि पुणे जिल्हा सह. गृह. महासंघ)

सहकार चळवळ ही आपल्या देशाची ताकद आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेले 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' ही संकल्पना भारतात मोठ्या प्रमाणावर बळकट होत आहे.

सभासदांनी परस्पर सहकार्याने संस्थांना स्वयंपूर्ण करावे – हीच खरी सहकारभावाची भावना आहे.

**६. प्रश्नोत्तरे सत्र – कायदेशीर मार्गदर्शन**

**वक्ते : ॲड. वसंतराव कर्जतकर** (जेष्ठ विधीज्ञ व तज्ञ संचालक, पुणे जिल्हा गृह महासंघ)

**ॲड. शंतनु खुर्जेकर** (जेष्ठ कायदेतज्ञ व तज्ञ संचालक, पुणे जिल्हा गृह महासंघ)

सहकारी संस्था कायदा १९६०, मोफा, रेरा आणि उपविधी २०१४ या सर्व कायद्यांचे ज्ञान प्रत्येक पदाधिकाऱ्याला असणे आवश्यक आहे.

जागरूकता, पारदर्शकता आणि कायदेशीर आचरण या तीन बाबी संस्थेच्या यशाची गुरुकिल्ली आहेत, असे त्यांनी सांगितले.

**उपस्थित मान्यवर**

या कार्यक्रमाला श्री. विलास थोरात आणि श्री. संभाजीराव घुंडरे (संचालक, पुणे जिल्हा सह. गृह. महासंघ) तसेच श्री. राहुल मोकाशी, श्री. विनायक जगताप आणि श्री. दिनेश काकुळते (संचालक – चिखली मोशी शाखा), श्री. राजेंद्र शिंदे हे विशेष उपस्थित होते.

या मार्गदर्शन मेळाव्यामुळे चिखली–मोशी परिसरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना कायद्याचे, आर्थिक आणि प्रशासकीय कामकाजाचे सर्वांगीण मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करून चिखली–मोशी शाखेने पुन्हा एकदा सहकारभावाचा आदर्श घालून दिला.

***


*With Best Compliments From*

KBPCIVIL ENGINEERING SERVICES

**PMC/PCMC/Government Approved Structural Auditor**

An ISO/iec 17025:2017 nabl accrediated laboratory

**KBP Civil Engineering Services Pvt. Ltd.**

Address : E2, Manali Arcade, Near D. Mart, Pune-Satara Road, Padmavati, Pune-411041

**Contact : 9226054262 / 8888226688**

**Email Id :** marketing@kbpcivil.in | **Website :** www.kbpengineers.com

*- OTHER SERVICES -*

1. Structural Audit & Stability Certification.
2. RCC & Steel Design.
3. Repair & Retrofitting Consultant.
4. Architectural Design
5. Estimation & Costing (As per RERA)
6. Property Valuation.
7. Construction Quality Audit.
8. Non Destructive Testing.

# गोवा आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५

**गो**वा...भारतातील एक निसर्गसमृद्ध आणि अत्यंत रमणीय, अतिथ्यशील राज्य... सहकार क्षेत्रातही वेगाने घोडदौड करीत असलेले. या ठिकाणी रिजेंटा बे वॉच या बीच रिसॉर्टमध्ये सहकार परिषद संपन्न झाली. परिषदेची सुरुवात अनोख्या सहकार दिंडीने टाळ, मृदंगच्या गजरात, सहकाराच्या घोषणा देत आणि सहकार्याची भावना मनात जागृत ठेऊन झाली.

**गोव्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर** हे पुण्याचे जावई, महाराष्ट्राचे अत्यंत साधे शिक्षक म्हणून आपल्या जीवनाची सुरुवात करणारे. पुढे राजकारणात संधी मिळाल्यावर आठ वेळा निवडणूक जिंकत या राज्याच्या जडणघडणीत मोठा वाटा उचललेला आहे.

गोवा येथे आयोजित दोन दिवसीय (१८/१९ नोव्हेंबर २०२५) आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे श्री. शिरोडकर खास निमंत्रित होते. गोव्याची सासुरवाडी असलेले सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक आणि **माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू** हे प्रमुख पाहुणे होते. तथापि, ते सिंगापूर येथे ब्लूमबर्ग आयोजित जागतिक उद्योजकीय परिषदेत सहभागी होते. सिंगापूर येथून त्यांनी ऑनलाइन सहभागी होत या परिषदेस मार्गदर्शन केले.

ब्लूमबर्ग ही जागतिक स्तरावरील उद्योग विश्वाची प्रगती, उलाढाल, वाटचाल याची नोंद ठेवणारी, सर्वेक्षण करणारी आणि वित्तीय सहयोग, मार्केट शेअर, शेअर मार्केट मधील चढ-उतार आदीबाबत सातत्यपूर्ण आढावा घेणारी जागतिक व्यावसायिक संस्था आहे.

श्री. सुभाष शिरोडकर यांनी आपल्या थेट साध्या सोप्या संवादातून सर्व उपस्थितांची मने जिंकली. त्यांनी मराठी, इंग्रजी आणि कोंकणी भाषेत संवाद साधला.

श्री. शिरोडकर म्हणाले, पुण्यावर माझे विशेष प्रेम. याचे कारण तुम्हाला माहिती आहेच...

महाराष्ट्राने मला खूप काही दिले. सहचारिणी दिली. एक शिक्षक म्हणून काम करण्याची प्रेरणा देखील पुण्यानं दिली. पुणं हे विद्येचे आगर. शिक्षक म्हणून दहा वर्ष काम केल्यावर मला राजकारणात येण्याची संधी मिळाली.

येथील मतदार संघ छोटे, त्यामुळे गावातील, तेथील लोकांची, त्यांच्या वाटचालीची खडा न खडा माहिती ठेवणे सोपे झाले. माझ्या मतदार संघात आठ हजार घरे आहेत, माझ्या मतदारांच्या हृदयात आणि त्यांच्या मनात. त्यामुळेच आठ वेळा निवडणूक जिंकणे शक्य झाले. राजकारण आणि समाजकारण हे एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. सहकार त्यातील प्रमुख भाग.

या राज्याने ही सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. आमचे राज्य छोटे. इथे करण्यासारखे भरपूर आहे, साडेचारशे वर्षाच्या पोर्तुगीज राजवटी नंतरही येथील सहकार्याची, संस्कृती, कला परंपरा नष्ट झाली नाही. याचे मुख्य कारण परस्पर सहकार्य आणि एकमेकांना समजून घेत सहकार्य करण्याची वृत्ती.. अनेक जगप्रसिद्ध व्यक्ती गोवा आणि कोकणाने दिले आहेत. आम्ही महाराष्ट्राचे सदैव ऋणी आहोत.

**'विकसित भारत सन २०४७'**

या संकल्पनेत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा आहे,त्यामुळे आणि त्या अनुषंगाने होत असलेल्या सर्व प्रयत्नात, बदलामध्ये आम्ही सातत्यपूर्ण प्रयत्नशील असू. गोवा आणि महाराष्ट्र मिळून सहकार क्षेत्रातील विविध घटकांमध्ये एकजीव होऊन काम करू शकतात, ही त्याची सुरुवात आहे. त्याचे नियोजन आपण करू या.

बांधकाम, संशोधन, शिक्षण, कला, संगीत, चित्रकारीता, चित्रपट उद्योग या व अनेक क्षेत्रात ही दोन राज्ये उत्तम काम करू शकतील.

केंद्रीय सहकार **राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ** यांनी विशेष शुभेच्छा पत्राद्वारे आपल्या शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन यांनी तसेच वरिष्ठ उपाध्यक्ष सीताराम राणे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. दिल्ली येथून एन.सी.सी.यू. च्या उप कार्यकारी अधिकारी **डॉ. सावित्री सिंह** तसेच त्यांचे सहकारी वाडकर, श्रीमती संध्या कपूर सहभागी झाले होते.

**महाराष्ट्राचे सहकार आयुक्त दीपक तावरे, गोव्याचे सहकार आयुक्त आशुतोष आपटे, पुणे विभागाचे सहकार उपनिबंधक संजय राऊत, मुंबई विभागाचे उपनिबंधक किरण सोनवणे** यांच्यासह महाराष्ट्रातील विविध विभागातून सहकार क्षेत्रातील मान्यवर, अभ्यासक या परिषदेत सहभागी झाले आहेत.

मलेशिया येथील सहकार चळवळीत शालेय स्तरावरील विद्यार्थी तसेच महिलांचा सहभाग आहे. त्याचा आढावा **रिका सुदार्तो ऑनलाईन** दृश्यप्रणालीद्वारे घेतला.

**गोवा येथील आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेने नेमके काय दिले?**

१) नवीन दृष्टी. जागतिक स्तरावरील बदल समजून घेत असताना 'लोकल ते ग्लोबल' हा कृती निरीक्षणातून समजून घेण्याचे ज्ञान आणि अनुभवांचे आदानप्रदान.

मूल्य आणि परंपरा यांना आधुनिक तंत्रज्ञान, सातत्यपूर्ण संवाद, वेगाने होत असलेल्या शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासन स्तरावर घेतले जाणारे वेगवान निर्णय त्याला जोड दिली गेली ती **'सहकार से समृद्धी'** ही केंद्र सरकारने दिलेली घोषणा कृतीत आणण्यासाठी करावयाचे नियोजन.

३) वर्षानुवर्षे सहकार क्षेत्र एका मर्यादित वेगाने प्रवास करीत होते,ते नियोजनबद्ध आणि दूरदृष्टीने आखलेल्या 'रोड मॅप' वरून जाण्यासाठी तयार झाले.

दोन दिवसांच्या या परिषदेत (१८ आणि १९ नोव्हेंबर २०२५) जवळपास **३० मान्यवरांनी** विविध सत्रामध्ये झालेल्या संवादात सहभाग घेतला, त्यात प्रामुख्याने **आदरणीय सुरेश प्रभू, गोव्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, महाराष्ट्र गृह निर्माण स्वयं आणि समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर, सहकार आयुक्त दीपक तावरे, आय टी क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासक आणि लेखक डॉ. अच्युत गोडबोले, सहकार क्षेत्रातील मान्यवर वकील, मार्गदर्शक श्रीप्रसाद परब, कॉसमॉस सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे** आदींनी वेधक आणि दूरदृष्टी आधारित विवेचन आणि प्रतिपादन केले. सहकार क्षेत्राच्या मार्गदर्शक आणि दिशा देणाऱ्या दिल्ली येथून खास उपस्थित राहिलेल्या **'एन सी यू आय' च्या उप कार्यकारी अधिकारी डॉ. सावित्री सिंह, डॉ. सागर वाडकर, संध्या कपूर, के के त्रिपाठी** यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. **गोव्याचे सहकारी संस्था रजिस्ट्रार आशुतोष आपटे, पुण्याचे जिल्हा उप निबंधक संजय राऊत व प्रकाश जगताप, मुंबई विभागाचे किरण सोनावणे** यांनी उपयुक्त माहिती दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावरून ऑनलाइन सहभागी झालेल्या **रिका सुदार्तो** (इंडोनेशिया), **लिझ थॉमस(ऑस्ट्रेलिया)** यांचा ऑनलाईन सहभाग महत्वाचा ठरला.

पुणे आणि महाराष्ट्र गृहनिर्माण आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष **सुहास पटवर्धन** यांनी दोन्ही दिवसातील महत्वपूर्ण सत्रांचे आणि प्रश्नोत्तर यांचे प्रभावी समायोजन केले. मुंबई गृह निर्माण आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष **प्रकाश दरेकर** आणि त्यांचे सहकारी, **राज्य महासंघाचे सचिव भास्कर म्हात्रे वरिष्ठ उपाध्यक्ष सीताराम राणे** यांचा महत्वपूर्ण सहभाग राहिला. या परिषदेस गोवा तसेच महाराष्ट्रातील सर्व प्रमुख जिल्ह्यातून या क्षेत्राशी निगडित पदाधिकारी आवर्जून आले होते.

या परिषदेचे मुख्य प्रायोजक आणि सह प्रायोजक सारस्वत बँक, आय पी डी एस, रांजेकर रिलिटी, पुणे यांच्या वतीने गृह निर्माण क्षेत्रातील वित्तीय सहकार्याची भूमिका प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आली.

ऋषिकेश कुलकर्णी (आय पी डी एस) अनिरुद्ध रांजेकर यांनी प्रश्नोत्तर सत्रात त्यांना विचारलेल्या प्रश्नांचे सविस्तर उत्तर देत स्वयं पुनर्विकसन तसेच गृह निर्माण क्षेत्रातील सद्यस्थितीवर व्यापक भाष्य केले. **युवा संवादक आर जे संग्राम** यांचे संबोधन तसेच पॉंडिचरी येथील आश्रमाच्या धर्तीवर सहकार क्षेत्रात उत्तम व्हीला आश्रम प्रकाराची सहज सुंदर रचना, निसर्गानुकुल वातावरण जपणारी व्यवस्था निर्माण करता येईल याबाबत **अजय सिंघानीया** यांनी सादरीकरण केले.

पुणे जिल्हा गृहनिर्माण आणि अपार्टमेंट महासंघाच्या **सचिव मनिषा कोष्टी** यांनी आभार मानले तर गोव्यातील युवा संवादिका **समृद्धी गणपुले** हिने दोन दिवसाच्या परिषदेचे अतिशय उत्तम सूत्र संचालन केले.

पुणे जिल्हा महासंघाचे संचालक **श्री. अव्हेलीनो नरोना** यांनी त्यांच्या मूळ गावी गोव्यात कार्यक्रम असल्याने अतिशय तन्मयतेने सर्व कार्यक्रमाचे नियोजन, तयारी व प्रत्यक्ष सहभाग घेतला. त्यांच्या आतिथ्यशील स्वभावामुळे सर्वांना परिषदेत कशाची कमतरता जाणवली नाही.

***

**– शब्दांकन : सुनील जोशी, पुणे**

(संस्थापक, अटलवास्तू, भारत)

*जागतिक परिषदेत विविध सहकार समृद्ध देशातील विभूषीना निमंत्रित केले होते.*

*त्यातील ऑस्ट्रेलिया आणि मलेशियातील tadny सहकार मित्रांनी दृक श्राव्य माध्यमातून त्या देशातील सहकार प्रणाली गोवा येथील सभागृहात पोहोचवली आणि आमच्याशी संवाद साधला.*

*याकामी ॲडव्होकेट परब यांचे सहकार्य मोलाचे आहे.*

# भटक्या श्वानांच्या कारवाईबाबत

**मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगकाने कारवाई करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : न्यायाप्र–२०२५/प्र.क्र.१३/नवि–२०**
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२५

**वाचा :**

१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. प्राजनि–२०२५/प्र.क्र.१३/नवि–२०, दिनांक २०.०३.२०२५.

२) मा. सर्वोच्च न्यायालय यांचे सु–मोटो रिट याचिका क्र. ०५/२०२५ मध्ये वेळोवेळी दिलेले निर्देश.

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अ.शा. पत्र दि. १३.११.२०२५

**प्रस्तावना :**

प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ शासन निर्णय, दिनांक २०.०३.२०२५ अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू करण्यात आले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे CITY HOUNDED BY STRAYS, KIDS PAY PRICE याबाबत सुमोटो रिट याचिका क्र.०५/२०२५ दाखल असून या प्रकरणी दिनांक ०३.११.२०२५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालय येथे मा. मुख्य सचिव स्वतः उपस्थित होते. मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश पाहता मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर बाब अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे असे स्पष्ट होते. भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव–श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. ही बाब पाहता सु–मोटो रिट याचिका क्र.०५/२०२५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल सुमोटो याचिका क्र.०५/२०२५ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका/सर्व नगरपरिषदा/सर्व नगरपंचायती यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :

०१. **भटक्या श्वानांना पकडून निर्बीजीकरण, लसीकरण व जंतुनिर्मुलन करणे –** राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंतनिर्मुलन करावे.

०२. **भटक्या श्वानांकरिता आश्रय / निवाऱ्यांची सोय –** महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतींनी त्यांच्या क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय करावी.

०३. **भटक्या श्वानांना खाण्यासाठी जागा निश्चित करणे –** महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती क्षेत्रातील भटक्या श्वानांकरिता खाण्यासाठी जागा निश्चित करण्यात याव्यात व त्याच जागेवर भटक्या श्वानांना खायला देण्यात येत आहे. याची खातरजमा करावी. इतर मोकळ्या ठिकाणी खायला देण्याऱ्याविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

०४. **हेल्पलाईन क्रमांक विकसित करणे –** राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायती क्षेत्रातील भटक्या श्वानांच्या तक्रारींकरिता हेल्पलाईन क्रमांक विकसित करावा. तसेच सदर तक्रारीचे लवकरात लवकर निवारण करावे.

०५. **रुग्णालयांनी नेहमीच अँटी रेबीज लस आणि इम्युनोग्लोबुलिनचा अनिवार्य साठा ठेवावा –** राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात नगर विकास विभाग, शासन परिपत्रक दि.२४.०९.२०२५ अन्वये सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारावे तसेच राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतींच्या अधिनस्त असणाऱ्या रुग्णालयांनी नेहमीच अँटी रेबीज लस आणि इम्युनोग्लोबुलिनचा अनिवार्य साठा ठेवावा.

०६. **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेलया निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीचा समन्वय करणे –** भटक्या श्वानांच्या संदर्भात मा. सर्वोच्च

न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका / सर्व नगरपरिषदा / सर्व नगरपंचायती यांच्यामध्ये समन्वय साधण्याकरिता आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांची याद्वारे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

०७. संबंधित महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचातयीच्या क्षेत्रातील शैक्षणिक संस्था, रुग्णालये (सार्वजनिक / खाजगी), क्रीडा संकुल, बस स्टैंड / डेपो (आंतरराज्य बस टर्मिनलसह) किंवा रेल्वे स्थानकाच्या परिसरात आढळण्याऱ्या प्रत्येक भटक्या श्वानांना ताबडतोब पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणानंतर नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलविण्याची जबाबदारी तसेच अशा भटक्या श्वानांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

०२. मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाखल सुमोटो याचिका क्र.०५/२०२५ च्या संदर्भात उपरोक्त सूचनांचे सर्व महानगरपालिका / सर्व नगरपरिषदा / सर्व नगरपंचायती यांनी काटेकोरपणे पालन करावे. तसेच, या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या आदेशाचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५१२२४१३२५५२६१२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

X X X

**– अजिंक्य बगाडे**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

***

# : महासंघाचे सहकार दरबार :

| अ.क्र. | सहकार दरबारचे नाव | वार | वेळ |
|---|---|---|---|
| १. | **धनकवडी** – रक्षालेखा सोसा., सर्व्हे क्र. ३०, विक्रमनगर, धनकवडी-४३. | पहिला रविवार<br>**श्री. शिवाजी उराडे** | (स. ११ ते १)<br>९४२३०१५९९६ |
| २. | **पिंपळे सौदागर** – गणेश रेसिडेन्सी, लोटस हॉस्पिटल जवळ, पिंपळे सौदागर, पुणे-२७. | पहिला रविवार<br>**श्री. चारुहास कुलकर्णी** | (स. ११ ते १)<br>९५५२५४६६०७ |
| ३. | **चिंचवड** – गोखले वृंदावन सोसा., चाफेकर चौक, चिंचवड, पुणे-३३. | दुसरा गुरुवार<br>**श्री. सुभाष कर्णिक** | (स. ११ ते १)<br>९७६६६०६१४६ |
| ४. | **मुख्य कार्यालय** – ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे-३०. | तिसरा शनिवार<br>**ॲड. प्रकाश तोंडारे** | (स. ११ ते १)<br>०२०-२४४५४०१० |
| ५. | **स्वप्नशिल्प** – स्वप्नशिल्प सोसा., वारजे क्षेत्रीय कार्यालयाजवळ, कोथरुड, पुणे-३८. | चौथा शनिवार<br>**श्री. सुभाष ढवळे** | (स. ११ ते १)<br>९४२१०५८२५५ |
| ६. | **तळेगाव दाभाडे** – समाज मंदिर (संस्था कार्यालय), समाज सेवक सह. गृह. संस्था म. (रेव्हेन्यू कॉलनी), चाकण रोड, फिश मार्केटच्या मागे, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०७. | चौथा रविवार<br>**ॲड. ज्योत्स्ना जोशी** | (स. ११ ते १)<br>९२६०२०१६५० |
| ७. | **सहकारनगर** – श्रीगजलक्ष्मी सह. गृह संस्था, सर्व्हे क्र. ८२/२अ, सहकारनगर-१, गांधी ट्रेनिंग कॉलेजसमोर, पुणे-०९. | दुसरा शनिवार<br>**श्री. श्रीराम कुंचुर** | (स. ११ ते १)<br>९४२२०१२१५६ |
| ८. | **औंध** – सुरोभी पार्क, ई-६०३, डीएसके आकाशगंगा शेजारी, नागरस रोड | दुसरा रविवार<br>**सौ. प्रीती शिरोडे** | (सायं. ४ ते ६)<br>९२८४५८८६३४ |
| ९. | **कोंढवा – कुमार सबलाईम सोसायटी** – पारगे नगर, कोंढवा खुर्द, पुणे ४११०४८. | चौथा रविवार<br>**श्री. अव्हेलिनो नरोना** | (स. ११ ते १)<br>९९७०४७३१८९ |
| १०. | **सिंहगड रोड** – ट्युलिप सोसायटी, नवशा मारुती जवळ, पुणे - ४११०५१. | पहिला रविवार<br>**श्री. विलास थोरात** | (स. ११ ते १)<br>९८९००५४३५१ |
| ११. | **विश्रांतवाडी** – कस्तुरबा सह. गृह संस्था, पुणे | **श्री. प्रकाश तोंडारे** | ९७६३६०३३८४ |

# इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना-हरकत न देणे

**कार्यालय,**
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे - ४११००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७ ई-मेल - commcoop2011@gmail.com

जा.क्र. गृह/डी-३/पुनर्विकास/सूचना/२०२५/१५७० दिनांक : ०४ नोव्हेंबर, २०२५

## परिपत्रक

**विषय :- सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी निबंधकांनी ''ना हरकत'' न देणेबाबत.**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्रमांक :- सगृयो २०१८/प्र.क्र. ८५/१४-स, दिनांक ०४/०७/२०१९

२. रिट याचिका क्र. १३५४४/२०२५ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १७/१०/२०२५ रोजी दिलेले आदेश.

महाराष्ट्र राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या पुनर्विकास प्रक्रियेला चालना देणेकरिता शासनाने दि. ०४ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९अ नुसार निदेश देऊन सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कार्यपद्धती विहीत केली आहे.

संदर्भ क्र.२ नुसार, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. १३५४४/२०२५ (बालत्झार फर्नांडिस विरुद्ध उपनिबंधक, सहकारी संस्था, एच-पश्चिम वार्ड, मुंबई व इतर) मध्ये दि.१७/१०/२०२५ रोजी मा. उच्च न्यायालयाने आदेशीत केले आहे की, शासनाच्या पुनर्विकासाबाबत दि.०४/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार निबंधकाची भूमिका व कार्य हे केवळ पर्यवेक्षकीय स्वरूपाचे आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि नियम, १९६१ मध्ये तसेच शासनाच्या दि.०४/०७/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासासाठी निबंधकाची ''ना हरकत'' देणेबाबत कोणतीही तरतूद नाही. निबंधकास संस्थेच्या पुनर्विकासाला मान्यता अथवा परवानगी देण्याचे अधिकार नाहीत. सदर आदेशानुसार मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण सभा हीच सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. संस्थेने पुनर्विकासाची प्रक्रिया राबविताना कायदा, नियम व उपविधी यांचे उल्लंघन केले आहे, असे संस्थेच्या एखाद्या सभासदास वाटल्यास अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये मा. सहकार न्यायालयात दाद मागणे हा कायदेशीर उपाय आहे. संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेल्या निर्णयास निबंधकास पुनरीक्षण, बदल अथवा नाकारण्याचा अधिकार नाही.

मा. उच्च न्यायालयाने दि.१७/१०/२०२५ रोजीच्या आदेशाद्वारे राज्यातील सर्व निबंधकांना परिपत्रकान्वये स्पष्ट सूचना देणेबाबत या कार्यालयास आदेशित केले आहे. सदर आदेशानुसार सर्व निबंधकांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) संस्थेने पुनर्विकासाचा विशेष सर्वसाधारण सभेकरीता प्राधिकृत अधिकारी नेमणुकी बाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निबंधकाने १४ दिवसात प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करावी. निबंधकाने विहीत मुदतीत प्राधिकृत अधिकारी न नेमल्यास अथवा प्राधिकृत अधिकारी नेमणुकीस नकार दिल्यास ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील.

(२) निबंधकाद्वारे नियुक्त प्राधिकृत अधिकारी संस्थेच्या पुनर्विकासासाठी विकासकाची निवड करण्याकरीता बोलविण्यात येणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहील, अशा सभेसाठी आवश्यक असा कोरम पूर्ण झाल्याची खात्री करेल. सभेच्या कामकाजाचे निरीक्षण करेल आणि सभेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग, इतिवृत्त, मतदान आणि ठरावाची नोंद योग्यरित्या झाला असल्याचा खात्री करतील.

३) संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासकाची निवड करण्याकरीता बोलविण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस, विषयसूची, सभासदांचे संमती पत्र, सभेचे इतिवृत्त व्हिडीओ रेकॉर्डिंग इ. च्या प्रती संस्थेने १५ दिवसात निबंधक कार्यालयात सादर कराव्यात आणि त्या निबंधक कार्यालयाने जतन करून ठेवाव्यात.

४) महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम मधील तरतुदी नुसार संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च आहे. विशेष सर्वसाधारण सभेची वैधता तसेच सदर सभेत घेतलेल्या निर्णयाची वैधता ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था १९६० चे कलम ९१ अन्वये सहकार न्यायालयाला असल्याने पुनर्विकासाबाबत विशेष सर्वसाधारण सभेत घेतलेल्या निर्णयाबाबत सभासदास आक्षेप असल्यास किंवा मान्य नसल्यास त्यांना सहकार न्यायालयात दाद मागणेबाबत कळवावे.

५) संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेल्या पुनर्विकासाच्या निर्णयावर निबंधकांनी पुनरीक्षण बदल अथवा नकाराधिकार (Veto) चे निर्णय घेण्यात येऊ नयेत.

६) राज्यातील निबंधकांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी ना हरकत बाबतचे कोणतेही प्रस्ताव / अर्ज मागणी करू नये, स्विकृत करू नये. अथवा त्यावर कोणतीही कार्यवाही करू नये तसेच पुनर्विकासाबाबत संस्थेस किंवा अन्य व्यक्तीस कोणत्याही स्वरूपाचे ना हरकत किंवा तत्सम प्रकारचे पत्र देऊ नये.

सर्व निबंधकांनी उक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. परिपत्रकातील उक्त नमुद सूचनांचे उल्लंघन करणारे अधिकारी शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिकृत संकेतस्थळ https://sahakarayukta.maharashtra.gov.in वर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

X X X

**(दिपक तावरे, भा.प्र.से.)**

सहकार आयुक्त व निबंधक

सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

***


## महासंघाची अधिकृत विक्री केंद्रे

- १. **स्कुलशॉपी –** दुकान क्र. ९, कॉर्पोरेशन बिल्डिंग, चैतन्य हॉस्पिटलसमोर, चापेकर चौक, चिंचवड, पुणे – ४११०३३. भ्रमणभाष : ९३२६०५४९०६
- २. **श्री स्टेशनर्स –** रेव्हेन्यू कॉलनी, तळेगाव दाभाडे, पुणे भ्रमणभाष : ९२७३५०५६०४
- ३. **निशा कन्सल्टन्सी –** कृतिका अपार्टमेंट, ग्रीन फुड रेस्टॉरंट जवळ, कोथरुड, पुणे ४११०३८. भ्रमणभाष : ९८५०८८८९७९
- ४. **सोसायटी प्लस –** बाजीराव रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे–४११०३०. भ्रमणभाष : ९३७००८८९९५
- ५. **प्राईड साईन –** वडगाव धायरी, पुणे – ४११०४१. भ्रमणभाष : ९११२१९१६११
- ६. **सुकन्या निरगुडे –** एच–४२, एकता सोसायटी, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे – ४११०३८. (शाखा : सासवड, कोडीत) भ्रमणभाष : ९१५६४१४१९१
- ७. **मे. एस. जे. खामकर ॲण्ड असोसिएटस् –** मुंढवा घोरपडी रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, मुंढवा, पुणे – ४११०३६. भ्रमणभाष : ९६२५३४३४३४
- ८. **स्वाती पवार – समर्थ सर्व्हिसेस –** स.नं. ४३/२, शिवांजली लेन नं. ३, दत्तनगर, आंबेगाव, पुणे – ४११०४६. भ्रमणभाष : ९४०३९७८९४३.
- ९. **पी.एल. इंदोरे ॲण्ड असोसिएटस् –** कमलराज दत्तविहार सोसायटी, मोशी, चिखली रोड, मोशी, पुणे – ४१२१०५. भ्रमणभाष : ९७३०७६७५७९
- १०. **द स्टेशनरी आयकॉन –** शॉप नं. ६, तुषार कॉम्प्लेक्स, पेट्रोलपंप समोर, पौड रोड, भुगाव, पुणे – ४१२११५.
- ११. **कुमार सबलाईम सोसायटी –** पारगे नगर, कोंढवा खुर्द, कोंढवा पोलिस स्टेशनमागे, पुणे – ४११०४८. दूरभाष : ०२०–४८६०७७१७
- १२. **सोसायटी स्मार्ट –** इस्टर्न विंग, जय गणेश विश्व, विश्रांतवाडी चौक, पुणे – ४११०१५. भ्रमणभाष : ९९६०८२९९९८
- १३. **शितल जाधव –** हिंजवडी पुणे को. ऑप. हाऊसिंग अलायन्स भ्रमणभाष : ८४८२८७३४४५

***

# गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी वाया जाणे कसे कमी करावे : एक सविस्तर मार्गदर्शन

**पा**णी हे आपल्या जीवनातील सर्वात मौल्यवान साधन आहे, पण त्याकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये रहिवाशांची संख्या मोठी असल्यामुळे आणि विविध सुविधा चालवण्यासाठी भरपूर पाणी लागल्यामुळे, पाण्याचा तुटवडा व त्याचा अपव्यय ही मोठी समस्या बनते. या लेखात सोसायट्यांमध्ये पाण्याचा अपव्यय कमी करण्याचे आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारण्याचे काही प्रभावी उपाय दिले आहेत–

**पाणी संवर्धन का आवश्यक आहे?**

१. **पाण्याची वाढती टंचाई –** भारतातील अनेक शहरांमध्ये पाण्याची कमतरता वाढत आहे आणि सोसायट्यांचा यात मोठा वाटा आहे.

२. **खर्चाचा भार –** पाणी वाया जाण्यामुळे सोसायटीच्या देखभालीचा व पाणीपुरवठ्याचा खर्च वाढतो.

३. **पर्यावरणावर परिणाम –** पाणी वाचवल्याने नैसर्गिक साधनांवरील ताण कमी होतो आणि पर्यावरणीय समतोल राखला जातो.

**सोसायटीसाठी पाणी वाचवण्याचे सर्वोत्तम उपाय**

१. प्रत्येक घरासाठी स्वतंत्र वॉटर मीटर बसवा.

प्रत्येक फ्लॅटमध्ये स्वतंत्र पाण्याचे मीटर बसवल्याने रहिवासी स्वतःच्या वापराबद्दल अधिक जबाबदार बनतात. स्वतःचा वापर दिसल्याने अनावश्यक पाणी वापर कमी होतो.

२. लिकेज त्वरित दुरुस्त करा.

गळती असलेले नळ, पाइप किंवा टाक्या पाणी वाया घालवतात. नियमित तपासणी करून या गळती लगेच दुरुस्त केल्यास मोठ्या प्रमाणात पाणी वाचू शकते.

३. पावसाचे पाणी साठवण्याची (Rainwater Harvesting) योजना राबवा.

पावसाचे पाणी गोळा करून त्याचा वापर बागकाम, साफसफाई किंवा शौचालयासाठी करता येतो. दीर्घकाळात हा एक अत्यंत किफायतशीर उपाय ठरतो.

४. पाणी–बचत करणारी फिटिंग्ज वापरा.

लो–फ्लो नळ, ड्युअल फ्लश टॉयलेट आणि एरेटर बसवल्याने पाण्याचा वापर लक्षणीयरीत्या कमी करता येतो.

५. बागकामात पाणी बचत करा.

बागेसाठी स्थानिक किंवा कमी पाण्यात वाढणारी झाडे निवडा. ड्रिप इरिगेशन सारख्या पद्धतींनी पाण्याचा अपव्यय टाळता येतो.

६. पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता योग्य वेळापत्रकाने करा.

टाक्या स्वच्छ करताना खूप पाणी वाया जाते. त्यामुळे नियोजनपूर्वक वेळापत्रक तयार करून, कमी पाण्यात स्वच्छता करता येईल अशा पद्धती वापरा.

७. रहिवाशांना जागरूक करा.

पाणी बचतीबाबत जागरूकता मोहिमा, कार्यशाळा आयोजित करा. ब्रश करताना किंवा भांडी धुताना नळ सतत सुरू न ठेवणे अशा छोट्या सवयींनी मोठा फरक पडतो.

८. सांडपाणी पुनर्वापर (Recycling Wastewater)

सिंक, शॉवर किंवा वॉशिंग मशीनमधून निघणारे ग्रे वॉटर पुनर्वापरासाठी वापरता येते – जसे की बागकाम किंवा शौचालय फ्लशसाठी.

**पाणी संवर्धनाचे फायदे**

**आर्थिक बचत –** पाणी वापर कमी झाल्याने सोसायटीचे देखभाल खर्च कमी होतात.

**शाश्वत विकास –** पर्यावरणपूरक पद्धती वापरणाऱ्या सोसायट्या जबाबदार समुदाय म्हणून ओळखल्या जातात.

**समाजातील प्रतिष्ठा वाढते –** पाणी संवर्धन करणाऱ्या सोसायट्यांना नागरिकांचा व पर्यावरणप्रेमींचा पाठिंबा मिळतो.

ADDA ॲपच्या मदतीने सोसायटीमधील पाण्याशी संबंधित तक्रारी जसे की गळती, खराब मीटर किंवा पाणीटंचाई – रहिवासी सहज नोंदवू शकतात.

व्यवस्थापन समिती देखील या ॲपद्वारे पाणी संवर्धनाबद्दल माहिती शेअर करू शकते, प्रगती ट्रॅक करू शकते आणि तक्रारींचे त्वरित निराकरण सुनिश्चित करू शकते.

यामुळे समुदायामध्ये सहकार्य वाढते आणि पाणी व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होते.

**निष्कर्ष**

गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाणी वाचवणे ही आता निकड नसून गरज बनली आहे. लहान–लहान उपाय – जसे की पाणी बचत करणारी फिटिंग्ज बसवणे, पावसाचे पाणी साठवणे आणि रहिवाशांना शिक्षित करणे – हे मोठे बदल घडवू शकतात.

**– अभिजित कुलकर्णी**
सहकार मित्र
संपर्क : ८८८८८७२३४५

***

## नोव्हेंबर २०२५ मध्ये एकूण १८ संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतले. महासंघ त्यांचे स्वागत करीत आहे.

१) **ब्रंह्मा एक्सोब्रंझ सह. गृह. संस्था, मर्या.**, कोंढवा, पुणे ४११०४८.

२) **मार्वल कॅसकडा सह. गृह. संस्था, मर्या.**, बालेवाडी, पुणे ४११०४५.

३) **रुणाल स्पेसियो सह. गृह. संस्था, मर्या.**, किवळे, पुणे ४१२१०१.

४) **स्टेट बँक स्टाफ सिंहगड सह. गृह. संस्था, मर्या.**, कोथरुड, पुणे ४११०३८.

५) **नेचर्स ब्लेसिंग्ज बिल्डींग बी सह. गृह. संस्था, मर्या.**, गोऱ्हे बु. पुणे.

६) **९० मधुकुंज सह. गृह. संस्था, मर्या.**, बोपोडी, पुणे ४११०२०.

७) **पार्क इन्फीनिया फेज–४ सह. गृह. संस्था, मर्या.**, फुरसुंगी, पुणे ४१२३०८.

८) **शंभु विहार सह. गृह. संस्था, मर्या.**, बाणेर, पुणे ४११००७.

९) **साई विराट एस बिल्डिंग सह. गृह. संस्था मर्या.**, वडगाव बु., पुणे ४११०५१.

१०) **राऊतबाग सह. गृह. संस्था मर्या.**, धनकवडी, पुणे ४११०४३.

११) **अिर्षा सह. गृह. संस्था, मर्या.**, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

१२) **दक्षतानगर सह. गृह. संस्था, मर्या.**, वाकड, पुणे ४११०२७.

१३) **अरुणोदय सह. गृह. संस्था, मर्या.**, कात्रज, पुणे ४११०४६.

१४) **तनिष पार्क एच विंग सह. गृह. संस्था, मर्या.**, चऱ्होली बु., पुणे ४१२१०५.

१५) **मिस्ट ॲक्वा बी आणि सी सह. गृह. संस्था, मर्या.**, गोऱ्हे बु., पुणे ४११०२३.

१६) **इपिक फेज २ सह. गृह. संस्था, मर्या.**, वाघोली, पुणे ४१२२०७.

१७) **एम्पायर इस्टेट बी बिल्डिंग सह. गृह. संस्था, मर्या.**, चिंचवड, पुणे ४११०१९.

१८) **लुंकड व्हॅलेंसिया सह. गृह. संस्था, मर्या.**, विमाननगर, पुणे ४११०१४.

***

## वसुली अहवाल

महासंघाकडे वसुलीसाठी एप्रिल २०२५ पासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत एकूण ४४१ केसेस होत्या त्यापैकी २८ केसेस बंद झाल्या असून त्यांची ६८.०८ लाख रुपये वसुली पूर्ण झाली आहे.


### –✻ निवेदन ✻–

सहकारी गृहरचना संस्थांशी संबंधित उत्पादने, सेवा, उपक्रम यांच्या जाहिराती वास्तुदर्शन मध्ये देण्यासाठी महासंघाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. (०२०–२४४५४०१०)

**उदा. आर्किटेक्ट, प्लंबर, इलेक्ट्रिशियन, अकाउंटस् रायटींग, सोसायटी व्यवस्थापन, पाण्याच्या टाक्या धुणे, पेस्ट कंट्रोल, वॉटर प्रुफींग, हाऊस किपिंग, सिक्युरीटी सर्व्हिसेस.**

ACB
ला. प्र. वि.
Anti Corruption Bureau Maharashtra
Our Work is Our Mission

# ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे

सरकारी नोकर किंवा लोकप्रतिनिधी यांनी
लाचेची मागणी केल्यास संपर्क करा –

टोल फ्रि क्रमांक – **1064**

दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802
(2) 020 - 26122134

E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in
Mobile App - www.acbmaharashtra.net

कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग,
ससून हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.

ACB
ला. प्र. वि.
Anti Corruption Bureau Maharashtra
Our Work is Our Mission

# लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे

कार्यालय : 'सी' बरॅक, सेंट्रल बिल्डींग, ससून
हॉस्पीटल समोर, पुणे ४११ ००१.

भ्रष्टाचारासंबंधी ऑनलाईन तक्रार येथे नोंदवा.

कोणत्याही शासकीय कार्यालयात लाचेची मागणी होत
असल्यास संपर्क साधा

तर करा फक्त एक फोन **1064** किंवा

**403781064**

दूरध्वनी क्रमांक : (1) 020 - 26132802 |
(2) 020 - 26122134
E-Mail : dyspacbpune@mahapolice.gov.in

## पुणे मनपा सहाय्यक आयुक्त कार्यालय तपशील

पुणे मनपा कार्यक्षेत्रात सर्व क्षेत्रीय कार्यालयात **दर महीन्याच्या शेवटच्या गुरुवारी ११ वाजता** नागरिकांच्या तक्रारीसंदर्भात **मोहल्ला कमिटी बैठक** असते. या बैठकीसाठी मनपाचे रस्ते, पाणी, आरोग्य, विद्युत, मलनिस्सारण विभागाचे अधिकारी उपस्थित असतात.

सहकारी गृह संस्थांच्या सभासद/पदाधिकारी यांनी आपापल्या भागातील क्षेत्रीय कार्यालयातील बैठकीला उपस्थित राहून तक्रारी नोंदवाव्यात व पाठपुरावा करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | ढोले पाटील रोड | – ०२० २५५९७३९४ |
| २) | येरवडा – कळस धानोरी | – ०२० २५५०९१०० |
| ३) | नगर रोड, वडगाव शेरी | – ०२० २५५०९००० |
| ४) | शिवाजीनगर – घोले रोड | – ०२० २५५०१५०० |
| ५) | कोथरुड – बावधन | – ०२० २५५०१६०० |
| ६) | औंध – बाणेर | – ०२० २५५०९७१० |
| ७) | धनकवडी – सहकारनगर | – ०२० २५५०८९०४ |
| ८) | वारजे कर्वेनगर | – ०२० २५५५९७७० |
| ९) | सिंहगड रोड | – ०२० २५५०८२०० |
| १०) | कोंढवा–येवलेवाडी | – ०२० २५५०८८०० |
| ११) | हडपसर – मुंढवा | – ०२० २५५९७४०० |
| १२) | वानवडी – रामटेकडी | – ०२० २५५९७४०० |
| १३) | कसबा – विश्रामबागवाडा | – ०२० २५५९७६०० |
| १४) | भवानी पेठ | – ०२० २५५०७२०० |
| १५) | बिबवेवाडी | – ०२० २५५०८७०० |

***

## मोफा आणि रेरा कायद्यासंदर्भात बैठक – २४ नोव्हेंबर २०२५

आज माननीय सहकार आयुक्तांनी मोफा कायदा रद्द करण्याच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी एक बैठक घेतली, ज्यामध्ये राज्य आणि जिल्हा फेडरेशन संचालक आणि क्रेडाईच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. सहकारी गृहनिर्माण चळवळीच्या वतीने, फेडरेशनने त्याचे आत्यंतिक विरोध दर्शवले आणि स्पष्ट केले की मोफा हा गृहनिर्माण क्षेत्राच्या मालमत्ता हक्क आणि हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक असलेला एक लाभकारी आणि संरक्षणात्मक कायदा आहे, त्यामुळे तो रद्द करणे योग्य नाही.

## नाशिक जिल्हा महासंघास सदिच्छा भेट – २५ नोव्हेंबर २०२५

महाराष्ट्र राज्य महासंघाचे अध्यक्ष मा. सुहासजी पटवर्धन व सौ. तृप्तीताई पटवर्धन यांनी नाशिक जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट महासंघाचे कार्यालयास भेट दिली असता त्याप्रसंगी सत्कार करताना फेडरेशनचे अध्यक्ष ॲड. तोरवणे, सेक्रेटरी ॲड. फटांगरे, प्रकाश गायकर, फेडरेशन व्यवस्थापक श्री. शिरसाठ, ॲड. ज्योती खैरनार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.


**महासंघातर्फे सहकारी संस्थांना नेहमी लागणारे फॉर्म्स, उपविधी, रजिस्टर्स, संस्था नोंदणीचे फॉर्मस्**
**पावती पुस्तके, व्हाऊचर्स यांची योग्य दरात विक्री महासंघाच्या मुख्य कार्यालयातून**
**सकाळी १०.३० ते सायं. ५.३० या वेळेत करण्यात येते.**

१) भाडेकरू सहभागीदारी संस्था पोटनियम– (फ्लॅट टाईप) इंग्रजी व मराठी
२) संस्था नोंदणी फॉर्मस् संच
३) पोटनियम दुरुस्ती फॉर्मस् संच
४) सभासद फॉर्म (इंग्रजी व मराठी)
५) सहसभासद फॉर्म
६) ट्रान्सफर फॉर्म संच
७) फॉर्म 'ओ' (लेखापरीक्षण दुरुस्ती)
८) फॉर्म 'ओ' पुरवणी
९) नॉमिनेशन फॉर्म (इंग्रजी व मराठी)
१०) रोजकीर्द
११) सभासद रजिस्टर नमुना 'आय'
१२) J रजिस्टर
१३) शेअर रजिस्टर
१४) प्रोसिडिंग बुक
१५) पावती पुस्तके
१६) व्हाऊचर पुस्तके
१७) व्यवस्थापन मार्गदर्शिका
१८) वसुली पुस्तिका
१९) निवडणूक पुस्तक
२०) नॉमिनेशन रजिस्टर
२१) मॉर्गेज रजिस्टर

*With Best Compliments From*

**Structural Auditor**

**Indrakumar Jagtap**

B.E. (Civil), CHARTERED ENGINEER

**Mobile : 9822332510 * Email : indrakumar.jagtap@gmail.com**
**Web : www.structuralauditorpune.com**

**1, Vyankateshwara Society, Inside From Trimurti Hospital,**
**Sinhgad Road, Vadgaon Budruk, Pune 411041.**

# नियमित पान

**सं**युक्त राष्ट्र संघाने जाहीर केल्याप्रमाणे यंदा आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे केले जात आहे. त्यानिमित्त महासंघाने वर्षभर विविध कार्यक्रम केले. दिनांक १८ व १९ नोव्हेंबर २०२५ ला महाराष्ट्र महासंघातर्फे मडगाव गोवा येथे आंतरराष्ट्रीय सहकार शिखर परिषद आयोजित केली होती. सहकारी संस्था चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच दिल्ली येथील NCUI या संस्थेचे आणि गोव्यातील संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सहकारातून चांगले विश्व निर्माण होते असा उद्देश वर्ष साजरे करण्यामागे आहे. याबाबत सहकार चळवळीतील कार्यरत असणारे आपण कार्यकर्ते काय करू शकतो याचा विचार आपण आता करणे आवश्यक आहे असे वाटते.

सहकार चळवळीतील मी एक छोटा कार्यकर्ता आहे. माझ्या मनात याबाबतचे विचार आले ते मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्रात सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटमध्ये सुमारे सहा कोटी कुटुंबे राहातात. विचार करूया की या सहा कोटी कुटुंबाने एक दिलाने एखादा कार्यक्रम राबविला, तर त्याचा केवढा मोठा परिणाम आपल्या भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वातावरणावर होईल! सहकारी गृहनिर्माण संस्थेत कार्यरत असणाऱ्या तुम्हा आम्हा सर्व कार्यकर्त्यांना याबाबत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे असे वाटते.

वर उल्लेखलेल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय वातावरणाचा परिणाम आपल्या सर्वांवर सातत्याने होत आहेच, पण तो परिणाम येणाऱ्या पुढील पिढ्यामध्ये होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या दृष्टीने आपण सर्वांनीच विचार करुया की याबाबत काय करता येईल.

प्रथम आपण पर्यावरणाबद्दल बोलूया.

वास्तुदर्शनच्या ऑक्टोबरच्या अंकात मी या विषयावर तुमच्याशी संवाद साधला होता. एखाद्या छोट्या कृतीतून आपण मोठे यश संपादन करू शकतो. याबाबत मी अगोदरच सुचवले होते की भाजी बाजारात कापडी पिशवी न्यावी आणि प्लास्टिक पिशव्या मध्ये भाजी घेणे बंद करावे.

पर्यावरणाचा विचार करतांना आपण मी सुचविलेली ही साधी कृती आपण सारे निश्चितच करू शकतो.

संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी याबाबत सातत्याने आपल्या सभासदांना छोटासा प्रयत्न करावा असे सांगावे, सूचना पत्रक पाठवावे, व्हाट्सअप ग्रुप वर आठवड्याला पाठवावे. संस्थेच्या सभेत सांगावे.

विचार करा, आपल्या पुण्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था मधील सभासदांनी प्लॅस्टिकच्या पिशव्या घेणे थांबविले तर रोज निदान हजारो पिशव्या रस्त्यावर / कचरा कुंडीत येणे थांबेल.

कोणताही प्रवास एका छोट्या पावलाने सुरू होतो. आपण सारे अशा छोट्या पावलापासून प्रवासाला सुरुवात करुया.

धन्यवाद.

**– सुभाष चं. कर्णिक**
उपाध्यक्ष

***

## Co-operation among co-operative

TDS clause under Section 80P(2)(d) of the Income Tax Act, 1961, which provides for a 100% deduction of income earned by a co-operative society by way of interest or dividends from its investments with any other co-operative society.



दि. ९ नोव्हेंबर २०२५ –
चिखली, मोशी मेळाव्यासाठी उपस्थित
सह. गृह संस्थांचे प्रतिनिधी

दि.९ नोव्हेंबर २०२५ – चिखली मेळाव्यात
मार्गदर्शन करताना
महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन





दि. १३ नोव्हेंबर २०२५ –
ठाणे जिल्हा सह. गृह महासंघाच्या
व्यवस्थापक प्रमाणपत्र कोर्सच्या सहभागींची
पुणे जिल्हा सह. गृह संस्था आणि अपार्टमेंट
महासंघाच्या कार्यालयास अभ्यास भेट.

दि. १२ नोव्हेंबर २०२५ –
ठाणे जिल्हा महासंघाच्या व्यवस्थापक प्रमाणपत्र कोर्सच्या
सहभागींनी पुणे महासंघाचे संचालक श्री. अव्हेलिनो नरोना
यांच्या कुमार सबलाईम संस्थेला अभ्यास भेट देऊन
कामकाजाची माहिती घेतली.



Regd. Newspaper - RNI No. MAHMAR/2015/63869



पुणे आणि महाराष्ट्र राज्य सह. गृह संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन यांची नाशिक जिल्हा सह. गृह संस्था आणि अपार्टमेंट महासंघाला सपत्नीक भेट. दि. २५ नोव्हेंबर २०२५.



आंतरराष्ट्रीय सहकार परिषद गोवा येथे मा. आमदार श्री. प्रविण दरेकर यांच्या हस्ते प्रसिद्ध लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांचा सन्मान उपस्थित महासंघाचे अध्यक्ष श्री. सुहास पटवर्धन, उपाध्यक्ष श्री. सीताराम राणे, श्री. प्रकाश दरेकर, सचिव मनीषा कोष्टी, तज्ज्ञ संचालक ॲड. श्रीप्रसाद परब.




दि. १८ नोव्हेंबर २०२५ – आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेसाठी उपस्थित पुणे जिल्हा महासंघाचे संचालक तसेच कर्मचारी




आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेत मार्गदर्शन करताना संध्या कपूर, व्यासपीठावर उपस्थित महासंघाचे तज्ज्ञ संचालक ॲड. शंतनू खुर्जेकर, ॲड. वसंतराव कर्जतकर, राज्य महासंघाचे तज्ज्ञ संचालक ॲड. श्रीप्रसाद परब, सचिव श्री. भास्कर म्हात्रे, श्री. सागर वाडकर (NCUI) आणि आर. जे. संग्राम.

**संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रमणभाष क्रमांक तसेच ई-मेल आय.डी. कृपया महासंघाला कळवावेत.**

''वास्तु-दर्शन'' च्या अंकांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी आणि जाहिरातींशी पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ सहमत असेलच असे नाही.

मा. अध्यक्ष / सचिव

**'वास्तुदर्शन'** हे मासिक पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ मर्यादित यांचे मालकीचे असून त्यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक **श्री. सुहास केशव पटवर्धन** यांनी श्री सिद्धिविनायक एंटरप्राइजेस, ए-६ विजयश्री टॉवर्स, दत्तवाडी, पुणे ४११ ०३०. येथे छापून ३१३ नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.

**संपादक – सुहास केशव पटवर्धन, मुद्रण स्थान : श्री सिद्धीविनायक एंटरप्राइजेस – ९८९००७३९४७**